**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या "ज्येष्ठ साहित्यिक कलावंतांना गौरववृत्ती देऊन सत्कार करणे " या योजनेच्या लेखाशिर्षामध्ये बदल करणेबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक :सासंमं २०१२/ प्र.क्र. २९/२०१२/भाषा -३
मंत्रालय , मुंबई-४०० ०३२,
दिनांक- २४ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ : १. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय क्र. सासंमं-२००१/प्र.क्र.१३५/ सां.का.२, दि.२३.११.२००१.
२. सचिव, महाराषट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. सासंमं २०१२/ ७८२, दि.२४.२.२०१२.

**प्रस्तावना** :- सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय क्र. सासंमं-२००१/प्र.क्र.१३५/ सां.का.२, दि.२३.११.२००१ अन्वये "महाराष्ट्र राज्य सहित्य आणि संस्कृती मंडळाचे सन १९८० साली विभाजन झाल्यावर मंडळाने हाती घेतलेल्या योजनांपैकी काही योजनांचा अंतर्भाव शासन निर्णयानुसार झालेल्या नसल्याने या योजना राबवितांना शासनाकडे मंजूरी घेऊन मगच कार्यक्रमाचे आयोजन करावे लागते. त्या योजनांपैकी "**ज्येष्ठ साहित्यिक - कलावंतांना गौरववृत्ती देऊन सत्कार करणे**" **(दरवर्षी २ व्यक्तींना)** या योजनेचा समावेश होतो. सदर योजना राबविण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती.

**शासन निर्णय** : सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्र. आरओबी २०१०/१०८/१८ (र.व का.), दि.२९.११.२०१० अन्वये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली असून त्यानुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आले आहे. संदर्भाधीन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय सासंमं-२००१/प्र.क्र.१३५/ सां.का.२, दि.२३.११.२००१ अन्वये मंजूर करण्यात येणा-या योजनांचा खर्च "**२२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन (०१) (११) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ०१५३)**" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आला होता. **त्याऐवजी** मराठी भाषा विभागाच्या मागणी क्र. **झेड एफ-०२, २२०५ कला व संस्कृती, १०२ - कला व संस्कृती प्रचालन, (०१) योजनेतर योजना (०१) (०१) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - १६ प्रकाशने**" या लेखाशिर्षाखाली प्रत्येक वर्षी मंजूर

केलेल्या आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून भागविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर गौरववृत्ती पुरस्कार योजनेस होणा-या खर्चास दि. २३.११.२००१ च्या संदर्भाधीन शासन निर्णयात अंतर्भुत करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय,वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ , भाग पहिला , उपविभाग -तीन, अनुक्रमांक ४ परिच्छेद २७(२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(संगणक संकेतांक क्र.२०१२१२१०१६४९१५०७३३)

(किशोर रा.कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई, नागपूर
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७. वित्त विभाग, (व्यय - ४ / सेवा ५ / विनियम), मंत्रालय, मुंबई,,
८. निवड नस्ती (भाषा-३)